**विधानसभेच्या ऑक्टोबर, २०१९ मध्ये होणाऱ्या
आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीतील
महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांच्या बैठका.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**परिपत्रक क्रमांक : १८८६९ /ड-३(समिती समन्वय)**
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १ ऑक्टोबर, २०१९

**संदर्भ:- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२५७८१/म.वि.स/ड-३ (समिती समन्वय), दि.१६ ऑक्टोबर, २०१८**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्षांना निदेशानुसार कळविण्यांत येते की, भारत सरकारच्या निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात विधानसभेसाठी मतदान दिनांक **२१ ऑक्टोबर, २०१९** रोजी होणार आहे. सदरहू निवडणूकीची अधिसूचना **दिनांक २७ सप्टेंबर, २०१९** रोजी निर्गमित करण्यात आली आहे. विधानसभेच्या सदर निवडणूकीसाठी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच दिनांक **२७ ऑक्टोबर, २०१९** रोजीपर्यंत आचारसंहिता लागू राहणार आहे. सदरहू निवडणूकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत राज्यातील शासकीय यंत्रणा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूकीच्या कामकाजात व्यस्त राहणार आहे. सबब, **महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांच्या बैठका विधान भवन, मुंबई येथे अथवा इतरत्र आयोजित करण्यात येऊ नयेत.**

तसेच, विधानमंडळ समित्यांच्या राज्यांतर्गत व राज्याबाहेरील दौऱ्यासंदर्भात मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी घातलेले निर्बंध यापूर्वीचे संदर्भाधीन परिपत्रक क्रमांक २५७८१/म.वि.स./ड-३(समिती समन्वय), दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ अन्वये निर्गमित केलेले असून उक्त आदेशांचा अंमल सुरु असल्याने समित्यांच्या दौऱ्यासंदर्भात वेगळे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

**( शिवदर्शन साठ्ये )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा.विरोधी पक्ष नेते (विधानसभा/विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
५) पध्दती विश्लेषक, संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

\\W\s-03\d\२०१९\D-3\Cordination\election २०१९\new circular.doc